महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ❖ ०४ एप्रिल २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २७६ ❖ पाने – ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## ३७ गावांची स्वतंत्र नगर परिषद ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : नवी मुंबईतील १४ गावांचा निर्णय अद्याप लागलेला नाही. वनमंत्री गणेश नाईक यांनी या गावाच्या पालिकेतील समावेशाला विरोध केला आहे. आता ते अंतिम निर्णय नक्की कधी घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच ठाणे जिल्ह्यातील नवी मुंबईतील १४ गावे, केडीएमसीमधील १८ गाव व अंबरनाथ तालुक्यातील पाच गावे, अशी ३७ गावांची स्वतंत्र नगर परिषद करावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाने केली आहे. या मागणीला मंत्री नाईक यांनी सकारात्मक कौल दिला आहे. नुकतीच १४ गावांतील पदाधिकाऱ्यांची बैठक बुधवारी (ता. २) पार पडली असून, यावर यात चर्चा झाल्याची माहिती आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील १४ गावे नवी मुंबई महापालिका हद्दीत समाविष्ट करण्याच्या निर्णयाला वनमंत्री गणेश नाईक यांनी विरोध केला आहे. त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत पत्र पाठविले आहे. नवी मुंबईसाठी १४ गावे भौगोलिकदृष्टया नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करणे व्यावहारिक होणार नाही, असे नाईक यांनी लिहलेल्या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे आता या १४ गावांचा फुटबॉल झाल्यासारखी परिस्थिती आहे. राज्याचे अधिवेशन संपले. तसेच ३१ मार्चची तारीखदेखील उलटली; मात्र कल्याण ग्रामीणमधील १४ गावांचा विषय अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे १४ गावे नक्की नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट होणार की नाही, असा प्रश्न येथील गावातील नागरिकांना पडला आहे. त्यातच आता कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील १४ गावे, केडीएमसीमधील १८ गावे आणि पाच गावे अंबरनाथ तालुक्यातील ही गावे घेऊन नवीन स्वतंत्र नगर परिषद करावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाने मंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली आहे. त्यामुळे १४ गावांचा विषय पुन्हा एकदा चर्चेला आला आहे.

माजी खासदार संजीव नाईक यांनी सांगितले की, मंत्री गणेश नाईक यांनी यासंदर्भात आपले मत व्यक्त केले आहे, मला विश्वास आहे की यासंदर्भात लवकरच निर्णय होईल, तर याच १४ गावांच्या विषयाबाबत १४ गाव विकास समितीने मनसे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांची भेट घेतली आहे. या विषयाबाबत राजू पाटील म्हणाले, की सदर गावे नवीमुंबई महापालिकेत घेण्याचा निर्णय झालेला आहे. गावांसाठी नगर विकास खात्याकडून किंवा सरकारकडून कोणताही निधी वर्ग झालेला नाही. त्यामुळे मंत्री नाईक यांची अशी भावना झाली आहे की नवी मुंबईवर तो भुर्दंड पडेल, परंतु आमची त्यांना एक विनंती आहे, इथला टॅक्स वसूल केला, तर शंभर-दीडशे कोटींची वसुली होईल. उगाच १४ गावे नवे मुंबईत सामील झाली आहे, त्याचा दप्तर घेण्यात दिरंगाई करून या गावकऱ्यांना वेठीस धरू नये, ही आमची विनंती आहे, असे मनसे नेते पाटील यांनी सांगितले. अधिवेशन संपले तरी १४ गावांचा कोणताही निर्णय झालेला नाही, तर ही १४ गावे, केडीएमसीमधील १८ गावे आणि अंबरनाथ तालुक्यातील पाच गावांची नवीन परिषद करावी, अशी मागणी केली आहे. नगर परिषदेच्या माध्यमातून या भागाचा विकास चांगला करता येईल. तसेच येथील विकासासाठी मंत्री नाईक योग्य निर्णय घेतील. या निर्णयाविषयी मंत्री नाईक शंभर टक्के सकारात्मक आहेत. ते सकारात्मक निर्णय लवकरच घेतील, अशी अपेक्षा आहे.

### सरकारचा १०० दिवसांचा कार्यक्रम

# प्रकल्प, योजना मार्गी लावण्यासाठी प्रशासनाची तारेवरची कसरत




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महायुती सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात हाती घेतलेल्या योजना, प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. मात्र हा नुसता सराव सामना असून खरी कसोटी, वनडे, २०:२० सामना पुढे खेळायची आहे, असा सूचक इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मंत्रालयीन सचिवांना दिला. सर्व विभागांनी येत्या १ मेपर्यंत नियोजित केलेली कामे पूर्ण करावीत तसेच प्रत्येक विभागाने शंभर दिवस कार्यक्रमाची माहिती आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान होताच देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सरकारच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याची संकल्पना मांडली होती. त्यानुसार २६ विभागांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. उद्याही उर्वरित २२ विभागांचा आढावा घेतला जाणार आहे. आजच्या बैठकीत सचिवांनी आपल्या विभागांनी केलेल्या कामांचे सादरीकरण केले. यात ४० टक्के कामे पूर्ण झाली असून ४० टक्के कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.तर २० टक्के कामे झालेली नसल्याचे समोर आले. त्यावर ही कामे अपूर्ण का राहिली याचा खुलासा करण्याच्या सूचना देतानाच ज्यांनी चांगली कामे केली आहेत अशा विभागांचे कौतुकही फडणवीस यांनी केले. तसेच १०० दिवसांचा कार्यक्रम हा केवळ सराव सामना असून खरी कसोटी सामना, वनडे पुढे खेळायची आहे. प्रत्येक विभागांनी हाती घेतलेली कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत असे आदेशही फडणवीस यांनी दिले. या मोहिमेंतर्गत विविध विभागांमार्फत आतापर्यंत ४११ कामांसंदर्भातील कार्यवाही पूर्ण झाली आहे. तर कार्यवाही सुरू असलेली ३७२ कामे सर्व विभागांनी येत्या १ मे पर्यंत पूर्ण करावीत तसेच प्रत्येक विभागाने शंभर दिवस कार्यक्रमाची माहिती आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी, असे आदेशही फडणवीस यांनी दिले.

शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत विभागांनी गतिमान काम करून लोकाभिमुख कार्यपद्धतीचा अनुभव जनतेला दिला आहे. त्यातून शासनाप्रति जनतेमध्ये चांगला दृष्टिकोन तयार होत आहे. शंभर दिवस कार्यक्रम ही संकल्पना अत्यंत उपयुक्त असून जिल्हास्तरावरही चांगला बदल होत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

#### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

शंभर दिवसांसाठीचा कृती आराखडा कार्यक्रम विभागांनी गांभीर्याने यशस्वी केला आहे. अनेक विभागांनी यामध्ये उत्तम काम केले आहे. नागरिकांना या माध्यमातून उपयुक्त आणि तत्पर सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शंभर दिवसांसाठी कार्यक्रमाचा कालावधी १५ दिवस वाढविण्यात आला आहे. विभागांनी गतिमानतेने लोकोपयोगी कामे गुणवत्तेसह आणि कालमर्यादेत पूर्ण करावीत. लोकप्रतिनिधींच्या पत्रांवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी विभागांनी आपल्या स्तरावर यंत्रणा कार्यान्वित करावी. उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तांत्रिक, प्रशासकीय आणि इतर आनुषंगिक बाबींची तातडीने पूर्तता करावी. विभागांनी उपलब्ध निधीचा सुयोग्य वापर करण्यास प्राधान्य द्यावे, असे आदेशही फडणवीस यांनी यावेळी दिले.

## माती उत्खननातून महसूल चोरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : तालुक्यातील माळ परिसरातून रात्रीच्या वेळी मुंबई, ठाणे येथे शेकडो ब्रास मातीची वाहतूक होत आहे. शासनाची रॉयल्टी बुडवून हा प्रकार सुरू असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते गोपाळ धानके यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. माळ परिसरातील शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत माती खोदकाम सुरू आहे. प्रत्यक्षात माती खोदण्यासाठीची रॉयल्टी काढली गेली आहे. त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त माती खोदण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे, ज्या ठिकाणी माती उत्खनन सुरू आहे. पण प्रत्यक्ष जागेवर भेट देण्याएवजी कार्यालयात बसून सर्कल अधिकारी रॉयल्टीच्या पावती तयार करत आहेत. त्यामुळे शासनाची रॉयल्टी बुडवून मातीची विक्री केली जात असल्याने या प्रकरणात माळ महसूल विभागाचे तलाठी, सर्कल अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी धानके यांनी केली आहे.

**शासनाने माळ परिसरातील जागांची प्रत्यक्ष पाहणी करून नेमकी किती माती काढण्यात आली आहे, याचा पंचनामा करावा. तसेच माती विकत घेणाऱ्यांकडून रॉयल्टी वसूल करावी.**
**– गोपाळ धानके, सामाजिक कार्यकर्ते, माळ**

# भीषण पाणीटंचाईत टँकर ठेकेदारांची चांदी

## शहापूरातील १४२ गावं–पाडे पाण्यासाठी आसूसले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : तालुक्यातील भिषण पाणी टंचाई पाहता टंचाईग्रस्त गांव- पाड्यांना टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी ठाणे जिल्हाधिकारी यांचेकडील आदेशान्वये विवेकांनद ट्रान्सलाईन प्रो.पा. विवेकांनद गोरखनाथ शर्मा यांना १ एप्रिल २०२५ ते दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत ठेका मंजुर करण्यांत आलेला आहे.यामध्ये ३३ टँकर मंजुर असताना २३ टँकर उपलब्ध करुन दिलेले असून उर्वरीत १० टँकर उपलब्ध करुन न दिल्याने शहापूर पंचायत समितीच्या पाणीपुरवठा उप विभागाच्या उप अभियंता यांनी ठेकेदाराला नोटीस पाठवली आहे. दरम्यान २४ तासाच्या आत सदर टँकर उपलब्ध करुन न दिल्यास दररोज ३ हजार रुपये दंड आकारण्यात येईल असे सूचित केले आहे.



तथापी तालुक्यात पाणी टंचाई सन २०२५ मध्ये टंचाईग्रस्त गाव- पाडयांना उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्याकडील टँकर मंजुरी आदेशान्वये २६ गांवे व १२६ पाडे अशा १४२ गांव- पाडयांना एकुण ३३ टँकर मंजुर केलेले आहेत. त्यापैकी ठेकेदार शर्मा याने आजपर्यंत फक्त २३ टँकर दिलेले आहेत. उर्वरीत १० टँकर उपलब्ध करुन दिलेले नाहीत.शहापुर तालुक्यातील काही टंचाईग्रस्त गांव-पाडे हे अतिदुर्गम व डोंगराळ भागात असुन ग्रामपंचायत कोथळे, कळभोंडे, अजनुप, माळ, फुगाळे, अंतर्गत असलेले गांव-पाडे व कसारा खुर्दमधील दांड व उमरावणे या गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरंपच,ग्रामपंचायत अधिकारी यांनी टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी पंचायत समितीकडे मागणी केली आहे.मात्र टँकरची अपुरी व्यवस्था असल्याने प्रशासनाला अडचण निर्माण झाली आहे.

तालुक्यातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी संपूनही काही योजनेचे काम अर्धवट अवस्थेत ठप्प झाले असल्याने जलजीवन योजनेच्या'हर घर जल'योजनेलाच घरघर लागली असल्याने ही योजनाच पूर्ण होत नसल्याने ठिकठिकाणी स्थानिक रहिवाशांना तिव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने महिला वर्ग संताप व्यक्त करीत आहेत.बिल मिळत नसल्याने अंतिम टप्प्यात आलेल्या योजना पूर्ण करण्यास ठेकेदार टाळाटाळ करीत असून अधिकारी वर्गही हताश झाला आहे. ज्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी जलजीवन योजनेची कामे घेतली आहेत त्यांनी कामांसाठी उसने पैसे घेतल्याने व दागिने गहाण ठेऊन कामे केल्याने आर्थिक कोंडी झाल्याने ते हवालदिल झाले आहेत.शासनाने कामाचे बिल लवकरात लवकर अदा करावे यासाठी पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हेलपाटे मारून आणि टक्केवारी देऊनही ते हताश झाले आहेत.दरम्यान सद्यस्थितीत १२६ पाडे व २६ गावांना ३३ टँकरने पाणीपुरवठा करण्याचे आदेश असून टँकर ठेकेदाराने फक्त २३ टँकर उपलब्ध केल्याने पाणी टंचाई असलेल्या गाव - पाड्यांना पिण्याचे पाणी देणे शक्य होत नाही. ठेकेदाराने उर्वरित १० टँकर न दिल्याने येथील टंचाईग्रस्त गावात पाणी देता येत नाही.त्यामुळे ग्रामस्थ संताप व्यक्त करीत आहेत.तथापी भावली पाणीपुरवठा योजनेवर जलजीवन मिशनच्या २१२ योजना मंजूर असून त्यापैकी ४० पूर्ण झाल्या आहेत.तर १६७ योजनांचे काम प्रगतीपथावर असून ५ योजना अजून तांत्रिक अडचणीमुळे सुरूच झाल्या नाहीत.

# सरकारचा अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला

### जनसुरक्षा कायद्याविरोधात पत्रकार संघटनांची तीव्र निदर्शने





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र सरकारच्या नव्याने आणलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायद्याविरोधात राज्यातील पत्रकार संघटनांनी तीव्र विरोध दर्शवत मुंबई मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्या माध्यमातून निदर्शने केली. हा कायदा माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा असल्याचा आरोप यावेळी सर्व पत्रकार संघटनानी केला असून,सरकारने विधेयक त्वरित मागे घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा यापुढील आंदोलन राज्यात तीव्र करू असा इशारा दिला. विशेष जनसुरक्षा विधेयक रद्द करावे, यासाठी लवकरच पत्रकार संघटनांच्या वतीने राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार आहे. मुंबईतील आझाद मैदान जवळ असलेल्या मराठी पत्रकार संघाच्या आवारातून रॅली काढत पत्रकारांनी निषेध व्यक्त करत आपली भूमिका मांडली. मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मुंबई प्रेस क्लब, मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, पुणे श्रमिक पत्रकार संघ, बृहन्मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ , मुंबई क्राईम रिपोर्टर असोसिएशन, मुंबई हिंदी पत्रकार संघ यांचे अध्यक्ष, पदाधिकारी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. "पत्रकारांच्या स्वातंत्र्याची मुस्कटदाबी आम्हाला मान्य नाही!" असे सांगत मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण म्हणाले, सरकारने अशी मनमानी करू नये. तर एस.ए.देशमुख म्हणाले, पत्रकार संरक्षण कायदा व्हावा म्हणून जसे राज्यभरात आम्ही आंदोलने केली तशी पुन्हा होऊ नये यासाठी आम्हाला भाग पाडू नका, तर ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे म्हणाले, सरकारच्या विरोधात पडलेली ही आंदोलनाची ठिणगी भडका होण्याअगोदर सरकारने गांभीर्याने विचार करावा, जेष्ठ पत्रकार किरण नाईक म्हणाले, आता आम्ही मागे हटणार नाही, पत्रकार संरक्षण कायद्यासाठी राज्यातील पत्रकारांना रस्त्यावर उतरावे लागले, ती वेळ आणून देऊ नका, असा इशारा दिला. तर जेष्ठ पत्रकार दिलीप सपाटे म्हणाले, हे विधेयक पत्रकार विरोधी असल्याने तीव्र विरोध करावा लागेल. जेष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ म्हणाले, जनतेवर अंकुश ठेवायची भीती का वाटते, प्रवीण पुरो म्हणाले, सर्व पत्रकारांनी सरकारला पत्र पाठवत विरोध करावा लागेल, दैनिक पुण्यनगरीचे संपादक शैलेंद्र शिर्के म्हणाले, आपण सर्वांना न्याय देण्यासाठी आवाज उठवून बातमी करतो. आपणास आता आपल्यालाच न्याय द्यायचा आहे. प्रेस क्लब चे पदाधिकारी सौरभ शर्मा म्हणाले, ही लढाई आता तीव्र केल्याशिवाय पर्याय नाही, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर म्हणाले, ईडी, सीबीआय झाली आता हे विधेयक आणले आहे, पत्रकार विनोद साळवी म्हणाले, ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भोईटे म्हणाले, पत्रकारांनी अशी एकजूट अजून दाखवली पाहिजे. बृहन्मुंबई महानगरपालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष मारुती मोरे म्हणाले आता आंदोलनाची ही सुरुवात आहे. सरकारने अंत पाहू नये."हा कायदा पत्रकारांच्या हक्कांवर घाला घालणारा आहे. जर तो लागू झाला, तर पत्रकारांवर अनेक निर्बंध येतील आणि सत्य बाहेर आणणे कठीण होईल." या कायद्यामुळे सरकारला कोणतीही बातमी 'राष्ट्रहिताविरोधी' असल्याचे सांगून हटवण्याचा अधिकार मिळणार आहे. तसेच, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांवर देखील बंधने लादली जाण्याची शक्यता आहे.असे संदीप चव्हाण यांनी सांगितले..यापूर्वीही पत्रकारांवरील नियंत्रण वाढवण्याच्या प्रयत्नांना विरोध झाला होता. मात्र, यावेळी पत्रकार संघटनांनी एकत्र येत सरकारविरोधात मोठे जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार केला आहे. संघटनांनी स्पष्ट केले आहे की, जर सरकारने कायदा मागे घेतला नाही, तर देशव्यापी आंदोलन छेडले जाईल. यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचाही विचार केला जात आहे. सरकारकडून अद्याप या मागण्यांवर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, विरोध वाढत असल्याने लवकरच काही स्पष्टीकरण मिळण्याची शक्यता आहे



# गीतासार



### अध्याय ६
### आत्मसंयमयोगः

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः । सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ६-३१ ॥

जो पुरुष ऐक्यभावाला प्राप्त होऊन सर्व सजीवमात्रात आत्मरूपाने असलेल्या मला सच्चिदानंदघन वासुदेवाला भजतो, तो योगी सर्व प्रकारचे व्यवहार करत असला तरी त्याचे सर्व व्यवहार माझ्यातच होत असतात. ॥ ६-३१ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ६-३२ ॥

हे अर्जुना, जो योगी आपल्याप्रमाणे सर्व सजीवमात्रांना समभावाने पाहतो, तसेच सर्वांमध्ये सुख किंवा दुःख समदृष्टीने पाहतो, तो योगी अत्यंत श्रेष्ठ मानला गेला आहे. ॥ ६-३२ ॥

अर्जुन उवाच योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन । एतस्याहं न पश्यामि चञ्चलत्वात्स्थितिं स्थिराम् ॥ ६-३३ ॥

अर्जुन म्हणाला, हे मधुसूदना (श्रीकृष्णा), जो हा समभावाचा योग तुम्ही सांगितलात, तो मन चंचल असल्यामुळे नित्य स्थिर राहील, असे मला वाटत नाही. ॥ ६-३३ ॥

चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् । तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ६-३४ ॥

कारण हे श्रीकृष्णा, हे मन मोठे चंचल, क्षोभविणारे, मोठे दृढ आणि बलवान आहे. त्यामुळे त्याला वश करणे मी वाऱ्याला अडविण्याप्रमाणेच अत्यंत कठीण समजतो. ॥ ६-३४ ॥

# राष्ट्रीय महिला आयोग (NCW)
## भूमिका, अधिकार आणि कार्ये




राष्ट्रीय महिला आयोग (NCW) ही भारतातील एक वैधानिक संस्था आहे जी महिलांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यासाठी जबाबदार आहे. ती लिंग समानतेसाठी एक वॉचडॉग म्हणून काम करते , महिलांच्या हिताचे रक्षण करणारे कायदे आणि धोरणांची योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करते. राष्ट्रीय महिला आयोग UPSC अभ्यासक्रम संवैधानिक आणि कायदेशीर सुरक्षा उपायांवर देखरेख ठेवणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि महिला सक्षमीकरणाशी संबंधित धोरणात्मक बाबींवर सरकारला सल्ला देणे यामध्ये त्याची भूमिका अधोरेखित करते.

### राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९० अंतर्गत १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. महिलांशी संबंधित कायदेशीर आणि धोरणात्मक चौकटींचा आढावा घेण्यासाठी आणि भेदभाव आणि हिंसाचाराच्या विरोधात एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली . हा आयोग राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर काम करतो , समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांचे हक्क राखले जातील याची खात्री करतो.

### राष्ट्रीय महिला आयोगाचे पहिले अध्यक्ष

राष्ट्रीय महिला आयोगाच्या पहिल्या अध्यक्षा जयंती पटनायक होत्या , ज्यांनी १९९२ ते १९९५ पर्यंत काम केले . त्यांच्या नेतृत्वाखाली, राष्ट्रीय महिला आयोगाने धोरणात्मक शिफारसी, कायदेशीर सुधारणा आणि महिलांच्या हक्कांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या जागरूकता मोहिमांचा पाया घातला. तेव्हापासून, भारतातील महिलांच्या उन्नती आणि संरक्षणासाठी काम करणाऱ्या अनेक उल्लेखनीय व्यक्तींनी हे पद भूषवले आहे .

### राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षांची नियुक्ती भारत सरकार करते आणि ते आयोगाचे प्रमुख म्हणून काम करतात. अध्यक्ष राष्ट्रीय महिला आयोगाचे धोरण निर्मिती, कायदेशीर हस्तक्षेप आणि जनजागृती कार्यक्रमांमध्ये नेतृत्व करतात . अध्यक्ष लिंग समानता, कायद्याची अंमलबजावणी आणि महिला कल्याणकारी उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात .

### राष्ट्रीय महिला अधिकार आणि कार्य आयोग

राष्ट्रीय महिला आयोगाकडे अनेक प्रमुख अधिकार आणि कार्ये आहेत जी त्यांना भारतात महिलांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यास सक्षम करतात . राष्ट्रीय महिला आयोग यूपीएससी अभ्यासक्रमात खालील भूमिकांवर भर देण्यात आला आहे.

**कायदेशीर सुरक्षा उपायांचा आढावा घेणे :** आयोग महिलांवर परिणाम करणारे कायदे आणि धोरणे तपासतो आणि त्यांच्या कल्याणासाठी सुधारणा किंवा नवीन कायदे सुचवतो.

**कायद्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख :** घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ सारखे विद्यमान कायदे योग्यरित्या अंमलात आणले जात आहेत याची खात्री करते .

**तक्रारींची चौकशी करणे :** घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा छळ, हुंडा समस्या आणि तस्करीशी संबंधित तक्रारी स्वीकारण्याचा आणि चौकशी करण्याचा अधिकार राष्ट्रीय महिला आयोगाला आहे .

**कायदेशीर आणि धोरणात्मक शिफारसी :** भारतातील महिलांची स्थिती सुधारण्यासाठी धोरणात्मक उपाययोजनांबाबत सरकारला सल्ला देते.

**जनजागृती मोहिमा :** महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल शिक्षित करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोग कार्यशाळा, चर्चासत्रे आणि आउटरीच कार्यक्रम आयोजित करते.

**संशोधन आणि डेटा संकलन :** आयोग महिलांवर परिणाम करणाऱ्या सामाजिक-आर्थिक परिस्थितींचा अभ्यास करतो आणि सरकारला डेटा-आधारित शिफारसी देतो.

**कायदेशीर प्रकरणांमध्ये हस्तक्षेप :** महिलांच्या हक्कांच्या उल्लंघनाशी संबंधित कायदेशीर कार्यवाहीत राष्ट्रीय महिला आयोग हस्तक्षेप करू शकते .

**स्वयंसेवी संस्था आणि राज्य आयोगांसोबत सहकार्य :** ते तळागाळातील प्रभाव सुनिश्चित करण्यासाठी गैर-सरकारी संस्था, राज्य महिला आयोग आणि कायदेशीर संस्थांसोबत काम करते .

### राष्ट्रीय महिला आयोगासमोरील आव्हाने

एनसीडब्ल्यूला वैधानिक दर्जा असूनही , त्याचे आदेश प्रभावीपणे अंमलात आणण्यात अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते:

**मर्यादित अंमलबजावणीचे अधिकार :** आयोग कारवाईची शिफारस करू शकतो, परंतु न्यायालयाप्रमाणे त्याला थेट अंमलबजावणीचे अधिकार नाहीत .

**गुन्ह्यांची नोंद कमी करणे :** सामाजिक कलंक आणि सूडाच्या भीतीमुळे अनेक महिला गुन्ह्यांची नोंद करण्यास कचरतात .

**संसाधनांचा अभाव :** राष्ट्रीय महिला आयोगाला अनेकदा अर्थसंकल्पीय आणि मनुष्यबळाच्या अडचणींचा सामना करावा लागतो , ज्यामुळे त्यांची पोहोच आणि कार्यक्षमता प्रभावित होते.

**कायदा अंमलबजावणीशी समन्वय :** राष्ट्रीय महिला आयोगाच्या शिफारशी आणि कायदा अंमलबजावणी संस्थांमध्ये अंमलबजावणीतील तफावत आहे , ज्यामुळे न्याय मिळण्यास विलंब होतो.

### महिला सक्षमीकरणात राष्ट्रीय महिला आयोगाचे महत्त्व

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अभ्यासक्रमात लिंग न्याय, कायदेशीर सुधारणा आणि धोरणात्मक वकिलीमध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची भूमिका अधोरेखित केली आहे . आयोगाने यामध्ये योगदान दिले आहे:

**कायदेशीर संरक्षण मजबूत करणे :** राष्ट्रीय महिला आयोगाच्या शिफारशींमुळे घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा छळ आणि हुंडा गुन्ह्यांविरुद्ध अधिक मजबूत कायदे निर्माण झाले आहेत .

**आर्थिक आणि सामाजिक उत्थान :** आयोग महिलांसाठी आर्थिक समावेशन, शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रमांना समर्थन देतो.

**आंतरराष्ट्रीय प्रतिनिधित्व :** महिला हक्क आणि लिंग समानतेसाठी वकिली करणाऱ्या जागतिक व्यासपीठांमध्ये राष्ट्रीय महिला आयोग सहभागी होते .

**निष्कर्ष :** राष्ट्रीय महिला आयोग (NCW) भारतात लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते .

१९९२ मध्ये स्थापन झालेले हे आयोग कायदेशीर सुधारणा, धोरणात्मक शिफारसी आणि जनजागृतीसाठी काम करत आहे . आव्हाने कायम असतानाही, न्याय सुनिश्चित करण्यासाठी, महिला सक्षमीकरणासाठी वकिली करण्यासाठी आणि धोरणात्मक निर्णयांवर प्रभाव पाडण्यासाठी त्याचे प्रयत्न भारताच्या प्रशासन चौकटीत एक महत्त्वाची संस्था बनवतात .महिलांचे हक्क विकसित होत असताना, अधिक न्याय्य आणि समावेशक समाज घडवण्यात NCW ची भूमिका महत्त्वाची राहते .

### वाचक मनोगत
## अशाही एका निर्णयाची अपेक्षा !

एक राज्य, एक गणवेश या संकल्पनेनुसार शालेय शिक्षण मंडळाने ज्या संस्थांना गणवेशाची कामे दिली होती त्या वेळेत पूर्ण करू शकल्या नाहीत अथवा याबाबत खूपच दिरंगाई झाली हे लक्षात येताच शालेय शिक्षण मंडळाने गणवेश बाबतचे सर्वाधिकार पुनश्च शाळा व्यवस्थापन समितीकडे सुपूर्त केले. मंडळाचा हा निर्णय योग्य आणि वेळेत घेतल्याचे समाधान आहे. जेणेकरून यापुढे विद्यार्थ्यांना वेळीच गणवेश मिळतील अशी आशा करूया असो. याच पार्श्वभूमीवर, शिक्षकांना देण्यात येणारी निवडणुकीची, अन्य शासकीय उपक्रमांची कामे, विविध शासकीय योजनांची कामें आदी. थोडक्यात काय, शिक्षकांना सरकारी कामात लावल्याने सहाजिकच विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देणे जमत नाही, शिकवणीकडे दुर्लक्ष होते हे ही नाकारता येत नाही आणि म्हणूनच अशी शासकीय शैक्षणिकबाह्य कामे शालेय शिक्षण मंडळाने अन्य संस्था, गरजू युवा पिढी, सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक यांना दिल्यास अशांना रोजगार उपलब्ध होईल आणि शिक्षकांनाही विद्यार्थ्यांसाठी अधिक वेळ देता येईल, देऊ शकतील.

\- विश्वनाथ पंडित, ठाणे

### सकल हिंदु समाजाच्या वतीने
## श्री रामनवमी निमित्ताने शोभायात्रा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सकल हिंदू समाजाच्या वतीने कल्याण पूर्व मध्ये श्री रामनवमी निमित्ताने भव्य शोभायात्रा 6 एप्रिल रोजी संध्याकाळी पाच वाजता काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेला कल्याण पूर्व विठ्ठलवाडी बस डेपो पासून सुरुवात होणार असून चक्की नाका येथे समाप्ती होणार आहे.

यावेळीअध्यक्ष हेमंत दरगोडे यांनी सांगितले की तीन वर्षांपासून आम्ही रामनवमीनिमित्त शोभायात्रा काढत आहोत. यावर्षी देखील हि शोभायात्रा विठ्ठलवाडी बस डेपोपासून सुरू होऊन ते पुढे काटेमानीवली नाका, तिसगाव नाका आणि चक्की नाका गुणगोपाल मंदिर याठिकाणी समाप्ती होणार आहे.

या शोभायात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे यात बहुसंख्येने रामभक्त एकत्र आलेले असतात. संपूर्ण कल्याण पूर्वेतील रामभक्तांना एकत्र आणणार हे व्यासपीठ आहे. या स्वागत समितीचे वैशिष्ट्य असं आहे की या स्वागत समितीवर सामान्य लोक एकत्र येऊन त्यांनी हे काम केलेलं आहे. या समितीचे प्रमुख उद्दिष्ट जर काही असेल ते हिंदू धर्माचं जागरण आणि प्रसारण करणे हे आहे. रामनवमीच्या स्वागत समितीचे अध्यक्षपद दीपक गुप्ता यांच्याकडे सोपविण्यात आलेले आहे. कल्याण पूर्वेतील सर्वांनी रामनवमी शोभायात्रा मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने पत्रकार परिषदेत करण्यात आले आहे.

# बापुसाहेब नेने फाउंडेशनचे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर
## मानसी केदारे यांच्या समवेत पाच जणांची निवड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सोबती संघटना व बापूसाहेब नेने फाउंडेशन पेण मार्फत ज्येष्ठ समाजसेविका शुभांगी नेने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी बापूसाहेब नेने फाउंडेशन तर्फे पाच शिक्षकांना आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार दिला जातो. तर सोबती संघटनेमार्फत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या पाच मान्यवरांना देखील सोबती आदर्श व्यक्तीमत्व पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षी सोबती मार्फत सामाजिक क्षेत्रात काम करणारे वडखळचे पोलिस निरीक्षक प्रसाद दशरथ पांढरे, कला क्षेत्रात काम करणारे राजेंद्रनाथ मारूती जोशी, क्रिडा क्षेत्रात काम करणारी ऋणाली प्रदिप मोकल शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे गुरुकुल शिक्षण संस्था वडखळ, वैद्यकिय क्षेत्र डॉ. सोनाली मनिष वनगे, तर बापूसाहेब नेने फाउंडेशन तर्फे आदर्श शिक्षक म्हणून सौ, मानसी मच्छिंद्र केदारे शाळा नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी, श्रीमती मनिषा अमृत दळवी शाळा डोलवी, किशोर पांडुरंग पाटील शाळा अंबिवली, सौ. सिमा रूपेश पाटील अंगणवाडी शाळा वडखळ, अदिंचा समावेश आहे. हा पुरस्कार सोहळा 14 एप्रिल 2025 रोजी सायंकाळी चार वाजता भाऊ साहेब नेने महाविद्यालयाच्या सभागृहात होणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी राधीकाताई घोरफडे पुणे, ज्येष्ठ समाजसेवक बापूसाहेब नेने व ज्येष्ठ समाजसेविका शुभांगी नेने यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी सोबती संघटनेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, सचिव डॉ. ॲड. निता कदम, खजिनदार निलेश म्हात्रे उपस्थित राहणार असून पेण शहरातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### आरोग्य
## कोणती द्राक्षे सर्वोत्तम



द्राक्षे खायला जितकी स्वादिष्ट लागतात, तितकीच आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. परंतु, द्राक्षांचे कोणते प्रकार अधिक फायदेशीर आहेत, हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. बहुतेक लोकांना द्राक्षांचे तीन प्रमुख प्रकार माहित असतील – लाल, हिरवी आणि काळी. पण ह्या तिघांपैकी कोणती द्राक्षे अधिक पोषणतत्त्वांनी भरलेली आहेत? कोणत्या प्रकारचा वापर आपल्या शरीरासाठी अधिक लाभदायक ठरेल? चला, जाणून घेऊया.

तर मुळात, हिरवी आणि काळी द्राक्षे अधिक गोड असतात. दोन्ही प्रकारात व्हिटॅमिन C, व्हिटॅमिन K, पोटॅशियम आणि फायबर्स आढळतात, जे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. काळी द्राक्षे शरीरातील जळजळ कमी करण्यास, रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि वृद्धत्व कमी करण्यास मदत करतात. याच वेळी, हिरवी द्राक्षे मधुमेहाच्या रुग्णांसाठी उपयुक्त आहेत, हाडे मजबूत करतात, रक्तदाब नियंत्रित करतात आणि पचनशक्ती वाढवतात. लाल द्राक्षे आंबट आणि गोड चवीची असून, ती चवीला अप्रतिम असतात. या द्राक्षांमध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात, जे मुक्त रॅडिकल्सशी लढून रोगांचा प्रभाव कमी करतात. याशिवाय, लाल द्राक्षांमध्ये व्हिटॅमिन A आणि C मुबलक प्रमाणात असतात, जे रोगप्रतिकारशक्तीला बळकटी देतात. रोज लाल द्राक्षे खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत होऊ शकते.

### आता प्रश्न असा आहे की, कोणती द्राक्षे खावीत?

तुमच्या गरजेनुसार, तुम्ही हिरवी, काळी किंवा लाल द्राक्षे निवडू शकता. जर तुम्हाला गोड आणि आंबट चव हवी असेल, तर हिरवी किंवा लाल द्राक्षे खा. गोड चव हवी असल्यास, काळी द्राक्षे खा. तज्ज्ञांच्या मते, काळी आणि लाल द्राक्षे अधिक आरोग्यदायी असतात, तर हिरव्या द्राक्षांमध्ये त्यांच्यापेक्षा थोडी कमी पोषणतत्त्वे असतात.

# सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराचा हात
## जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते रिक्षा व यंत्रसामग्री वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अलिबाग : राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व बीज भांडवल कर्ज योजनेअंतर्गत जिल्हा उद्योग केंद्र, रायगड मार्फत बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याच उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे लाभार्थ्यांना रिक्षा व यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) डॉ. रविंद्र शेळके, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,श्री देवकाते , जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, विजयकुमार कुलकर्णी,महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जी. एस. हरळय्या, तसेच विविध बँक व उद्योग केंद्रांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हा उद्योग केंद्र, रायगडसाठी प्राप्त 744 प्रकरणांपैकी 755 प्रकरणांना बँकेकडून मंजुरी मिळाली असून उद्दिष्टांच्या 100% हून अधिक पूर्तता करण्यात आली आहे. यशस्वी नियोजन व मार्गदर्शनाखाली हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. तसेच बीज भांडवल कर्ज योजनेतील उद्दिष्टेही 100% पूर्ण करण्यात आली आहेत.या योजनेंतर्गत ऑटो रिक्षा व्यवसायासाठी श्री. विरेंद्र देवराम टिके, श्री. वैभव नामदेव जिते आणि श्री. पांडुरंग रामा जायनाखवा (रा. अलिबाग) यांना स्टेट बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ महाराष्ट्र, अलिबाग शाखेमार्फत कर्ज मंजूर करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत श्रीमती. मुग्धा महेंद्र तुपे यांना बँक ऑफ बडोदा, अलिबाग शाखेकडून अनुदानाच्या सहाय्याने सोडा वॉटर व्यवसायासाठी यंत्रसामग्री प्रदान करण्यात आली.

राज्य शासनाच्या या योजनांमुळे जिल्ह्यातील अनेक बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी मिळत असून, त्यांना आर्थिक स्थैर्य व विकासाच्या दिशेने मार्गदर्शन मिळत आहे.

# ३५ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर सुरेखा देसाई सेवानिवृत्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




पेण: सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली मराठी प्राथमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षिका सुरेखा आकाराम देसाई हया आपल्या ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांचा सेवापुर्ती सोहळा विद्यालयाच्या वतीने विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी हितचिंतक ,आप्तेष्ट ,नातेवाईक, विद्यार्थी, सहकारी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या वतीने शाल ,श्रीफळ ,स्मृतीचिन्ह ,सन्मानपत्र देऊन त्यांना सेवापूर्ती समारंभ निमित्त भावपूर्ण निरोप देण्यात आला.

कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयात गेल्या ३५ वर्षापासून सहाय्यक शिक्षिका पदावर कार्यरत असणार्य सुरेखा आकाराम देसाई ह्या ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाल्या. सुरेखा देसाई यांनी बजावलेल्या सेवे करीता त्यांच्या सेवापूर्ती समारंभ विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान मराठी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वनिता कोळी यांनी भूषविले. यावेळी सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे ,माजी मुख्याध्यापिका हेमलता पाटील , हिंदी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश पाटील ,इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका कल्पना कुलकर्णी, आकाराम देसाई, मारुती देसाई, उत्तम पाटील, जयंत मोहिते तसेच नातेवाईक मित्र परिवार वर्गशिक्षक, वर्गमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून सुरेखा देसाई यांचे जीवनातील चढ उताराचा आलेख मांडला. त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्य हे विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरित असे असल्याचे यावेळी मुख्याध्यापिका वनिता कोळी यांनी सांगितले.सत्कारमूर्ती सुरेखा देसाई यांना शाल ,श्रीफळ, स्मृतीचिन्ह सप्रेम भेट देऊन ५८ प्रज्वलित दिव्यांनी त्यांची ओवाळणी करण्यात आली .चॉकलेट व नाण्यांचा हार त्यांना परिधान करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना सुरेखा देसाई यांनी सांगितले की सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या मराठी प्राथमिक विभागात काम करण्याची संधी शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांनी मला दिल्याने माझ्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सोने झाले .माझा सहकारी सर्व परिवार हा माझ्याबरोबर काम करीत असताना जीवाभावाचे ऋणानुबंध जपून वागणूक दिल्यामुळे मी भारावून गेलो आहे .माझ्या सर्व सहकारी मित्र वर्गाचे माझ्याविषयी असलेले प्रेम कधीच विसरू शकणार नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर जैवळ यांनी केले.

# मुरबाडच्या कोरावळे जिल्हा परिषद शाळेत
## एनएमएमएस परीक्षेत संचिता धुमाळ तालुक्यात प्रथम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




मुरबाड : मुरबाड तालुक्यातील कोरावळे जिल्हा परिषदेच्या शाळेने राष्ट्रीय गुणवत्ता सह शिष्यवृत्ती (एनएमएमएस ) परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. शाळेतील विद्यार्थिनी संचिता जगदीश धुमाळ हिने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर अर्चना अनिल धुमाळ हिने तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या दोघी विद्यार्थिनींनी जिल्हा गुणवत्ता यादीतही स्थान मिळवले आहे.

एनएमएमएस ही इयत्ता ८ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षा आहे. ही परीक्षा विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता आणि शैक्षणिक क्षमता तपासण्यासाठी घेतली जाते. या परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुढील ४ वर्षांसाठी दरमहा १ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी आर्थिक मदत करते. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या या परीक्षेत, वर्षभराच्या अभ्यासक्रमावर आधारित असूनही कोरावळे शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. संचिता धुमाळ आणि अर्चना धुमाळ यांच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे शाळेचे नाव तालुक्यात उंचावले आहे. या यशाबद्दल शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. संचिता आणि अर्चना यांच्या पालकांनीही आपल्या मुलींच्या या उज्ज्वल भविष्याच्या दिशेने टाकलेल्या पावलांबद्दल समाधान व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक मंगलदास कंटे आणि वर्गशिक्षक कृष्णकांत मलिक यांच्यासह मार्गदर्शक शिक्षक प्रशांत माळी, सीमा सोनवणे, शोभा उबाळे, अनिल भोईर, प्रतीक्षा धुमाळ आणि वृषाली धुमाळ यांनी या विद्यार्थिनींच्या कठोर परिश्रमाचे आणि त्यांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले. या परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन केले होते, ज्याचा विद्यार्थ्यांना खूप फायदा झाला. तालुक्यातील शिक्षण विभागानेही गटशिक्षणाधिकारी संप्रदा पानसरे आणि विस्तार अधिकारी दिगंबर पोटे यांच्यासह या यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. कोरावळे जिल्हा परिषदेळ शाळेच्या या यशाने इतर शाळांनाही प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# राजा शिवाजी विद्यामंदिरचे ८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा NMMS (National Means Cum Merit Scholarship) घेतली जाते. सदरची परीक्षा दिनांक 22 डिसेंबर 2024 रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे राजा शिवाजी विद्यामंदिर, लोकमान्य नगर शाळेतील शेडगे राजवीर सचिन, राजपूत वैष्णवी प्रकाश, गोल्हे तन्मय लक्ष्मण, मलपे सार्थक मनेश, टकले प्रणाली राहुल, जाधव तनया भास्कर, चिर्लेकर सृष्टी शशिकांत, सावंत श्रीधर संतोष या 08 विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.पास झालेले सर्व विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना 4 वर्षांसाठी ₹12,000 प्रमाणे प्रति वर्ष एकूण ₹48,000 तर इयत्ता 9 वी ते 12 वी पर्यंत शिष्यवृत्ती मिळणार आहे. राजा शिवाजी विद्यामंदिरचे विद्यार्थी या संधीचे सोने करतात. आतापर्यंत शाळेतून एकूण 249 विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली आहे. त्यामुळे सदरची शाळा प्रज्ञावंतांची शाळा बनतेय.

या शाळेतील शिक्षक मुलांची काळजी घेतात आणि NMMS आणि सरकारी शिष्यवृत्ती परीक्षांच्या तयारीसाठी अतिरिक्त वेळ देतात अशा समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या शिक्षकांचे तसेच शालेय समिती अध्यक्ष घाडगे सर, मुख्याध्यापक थोरात सर, पर्यवेक्षक माने सर, यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक यांचे शाळा व संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात मुरबाडमध्ये पत्रकारांची निदर्शने

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध आणणाऱ्या प्रस्तावित जनसुरक्षा विधेयकास विरोध करण्या साठी आज दि : ३ एप्रिल रोजी मुरबाड तहसीलदार कार्यालया समोर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या ठाणे जिल्हा व मुरबाड तालुका पदाधिकाऱ्यांनी काळ्या फिती लावून जोरदार घोषणाबाजी करीत निदर्शने केली. या प्रसंगी जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधातील निवदन नायब तहसीलदार अमोल शिंदे यांना देण्यात आले. या प्रसंगी राज्य पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर करडे, जिल्हा संघटक संतोष राऊत, मुरबाड तालुका अध्यक्ष दिलीप पवार, कार्याध्यक्ष विलास जाधव, सचिव संजय बोरगे, डिजिटल मीडियाचे अध्यक्ष चेतन पोतदार , किशोर बांगर हे पत्रकार उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सन २०२४ चे जनसुरक्षा विधानसभा विधेयक क्रमांक ३३ अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करणारे असून, घटनेचा मुलभूत अधिकारांविरोधात आहे. जनसुरक्षेच्या गोंडस नावाखाली राज्य सरकार लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आक्रमण करू पाहत आहे . या कायद्याचा फटका , पत्रकार आणि प्रसार माध्यमांना सर्वाधिक बसणार आहे. त्या मुळे पत्रकारांनी पुढाकार घेत या कायद्याला ठामपने विरोध दर्शवला आहे.हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मुलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनावर कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करत असून त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीचा आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो.अभिव्यक्ती स्वतंत्र हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्वाचे वैशिष्ठ असून त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे हा लोकशाही मुल्यांचा आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे. या विधेयकामुळे पुढील गंभीर परिणाम होऊ शकतात. नागरिकांना त्यांचे मत मांडण्यास किंवा सरकारच्या धोरणांवर टीका करण्यास अडथळा निर्माण होईल, जो संविधानाने दिलेल्या हक्कांच्या विरोधात आहे.

२) स्वतंत्र पत्रकार, मिडिया संस्था आणि सोशल मिडियावरील विचारप्रवर्तक यांना या विधेयकाचा गैरवापर करून लक्ष्य केले जाऊ शकते.

३) सामाजिक संघटना व एनजीओ यांचा वैध आंदोलनावर निबंध येऊन जनतेच्या न्याय मागण्यांवर अन्यायकारक मर्यादा येऊ शकतात.

४) "विविक्षित बेकायदेशीर कृत्ये" हि संकल्पना निट स्पष्ट न करता दिल्यामुळे प्रशासन आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थाना अवास्तव अधिकार मिळतीन, ज्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य आणि मुलभूत अधिकार धोक्यात येतीन.

5) या विधयकामुळे लोकशाही मुल्यांवर परिणाम होईल आणि नागरिकांचा सरकारवर प्रश्न विचारण्याचा हक्क मर्यादित केला जाईल.तरी या विधेयकामुळे महारष्ट्रातील नागरी हक्क, लोकशाही मूल्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम होईन, त्यामुळे आम्ही महाराष्ट्र सरकारला आणि विधान मंडळ समितीला आग्रहपूर्वक विनंती करतो कि हे विधेयक रद्द करण्यात यावे असे तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# बंदिजनांच्या आयुष्यात 'सकारात्मकते'ची पहाट

## कारागृहात मिळतेय गीतेतून जीवन जगण्याची नवी दृष्टी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : क्रोध, द्वेष आणि घृणेपोटी किंवा परिस्थितीमुळे गुन्हे घडत असतात. अशा गुन्हेगारांच्या आयुष्यात भगवद्गीतेच्या माध्यमातून सकारात्मकतेची जोड दिल्यास त्यांच्या आयुष्यात नवी पहाट निर्माण होऊ शकते. याचा प्रत्यय सध्या महाराष्ट्रातील कारागृहातून १९० बंदिजनांच्या साधनेतून दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून कारागृहात भगवद्गीतेच्या श्लोकांचे सूर घुमत आहेत.

मागील वर्षभर गीता परिवाराच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्राच्या केंद्रीय कारागृहात भगवद्गीता संथा वर्ग सुरू आहेत. स्वामी श्री गोविंद देवगिरीजी महाराजांनी स्थापन केलेल्या गीता परिवारातील स्वयंसेवक या उपक्रमामध्ये प्रशिक्षकाची भूमिका पार पाडत आहेत. गीता परिवारद्वारा आजतागायत १२ लाख साधकांना ऑनलाईन प्रशिक्षण दिले गेले आहे. पूर्णपणे निःशुल्क असे हे वर्ग १३ भाषांतून व २१ 'टाईम स्लॉट्स ' मध्ये सोमवार ते शुक्रवार दररोज घेतले जात आहेत. हा वर्ग ४० मिनिटांचा आहे. वर्गामध्ये गीतेच्या श्लोकांचे शुद्ध उच्चारण शिकवले जाते. राज्यात या उपक्रमाचा व्यापक स्तरावर विस्तार करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या उपक्रमाच्या ऑनलाईन वर्गासाठी तांत्रिक बाबींची पूर्तता कारागृह प्रशासक आणि कर्मचारी करत आहेत. सर्वप्रथम छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात डिसेंबर २०२३ मध्ये पहिला वर्ग सुरू झाला. टप्प्याटप्प्याने यात कोल्हापूर, नाशिक, ठाणे, तळोजा येथील केंद्रीय कारागृहांना समाविष्ट केले गेले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात २५, ठाणे ३५, कोल्हापूर ४५, नाशिक ४०, तळोजा ३५, येरवडा १० कैद्यांचा समावेश आहे. या कारागृहातील सुमारे १९० बंदी साधक गीता श्लोक पठण करीत आहेत.

प्रत्येक अध्यायाचे अर्थ विवेचन सुद्धा ऑनलाईन माध्यमातून केले जात आहे. सध्या ठाणे, नाशिक, कोल्हापूर आणि तळोजा येथील कारागृहांमध्ये तिसऱ्या टप्प्यांचे प्रशिक्षण पूर्ण होत आले आहे. येथे एकूण १२ अध्यायांचे प्रशिक्षण पूर्ण होत आहे. गीता परिवाराकडून सरळ पठणीय गीतेची पुस्तके साधकांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कारागृह अधिकारी आणि साधक या उपक्रमाबाबत समाधानी आहेत. याबरोबरच येरवडा महिला कारागृहामध्ये प्रत्यक्ष वर्ग घेण्यात आले.पुरुष बंदी बांधवांकरिता रविवारी उद्बोधनपर व्याख्याने घेतली जात आहेत.

शनिवारी व रविवारी शिकलेल्या श्लोकांचे विवेचन केले जाते. यावेळी उपस्थित साधकांच्या शंकांचे निरसनदेखील केली जाते. गीता परिवाराचे हे वर्ग चार टप्प्यांमध्ये चालत आहेत. या चार टप्प्यातील वर्गांना चार स्तर म्हटले जाते. पहिल्या स्तरावर दोन अध्याय शिकवले जातात. दुसऱ्या स्तरामध्ये चार अध्याय शिकवले जातात. तिसऱ्या आणि चौथ्या स्तरमध्ये प्रत्येकी सहा अध्याय शिकवले जातात.

या उपक्रमामुळे बंदीजनांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हा उपक्रम निश्चितच बंदीजनांना नव्या आयुष्याच्या वळणावर आणण्यास यशस्वी होत आहे. अशा उपक्रमांमुळे बंदीजन आपल्या कुटुंबात परत येवून एक चांगले आयुष्य जगू शकणार आहेत, असा विश्वास कारागृह प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# केडीएमसी अग्निशमन दलाकडून प्रदर्शनाद्वारे जनजागृती

## अग्निशमन सप्ताहात राबवले जात आहेत विविध उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सध्या अग्निशमन दलाचा सप्ताह सुरू असून त्याचाच एक भाग म्हणून केडीएमसी अग्निशमन दलातर्फे प्रदर्शनाद्वारे जनजागृती केली जात आहे. या प्रदर्शनाला नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. केडीएमसी प्रभारी आयुक्त हर्षल गायकवाड यांनी देखील या प्रदर्शनाला भेट देत या उपक्रमाची आणि अग्निशमन दलाची माहिती घेतली.



दरवर्षी 1 एप्रिलपासून संपूर्ण राज्यभरात अग्निशमन सप्ताह साजरा केला जातो. ज्यामध्ये अग्निशमन दलाकडील अत्याधुनिक यंत्रणा-साधन सामुग्री प्रदर्शन, शहरातील सोसायटींमध्ये जाऊन रहिवाशांमध्ये जनजागृती, सायकल रॅली आदी उपक्रमांचा समावेश असल्याची माहिती केडीएसमीचे मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांनी दिली. तसेच याच सप्ताहाचा भाग म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिका अग्निशमन दलाच्या आधारवाडी येथील मुख्यालयात एका प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून येत्या दिवसांत पुढील सर्व अग्निशमन केंद्रांमध्ये अशाच प्रकारचे प्रदर्शन राबवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

तर अग्निशमन दलाने या प्रदर्शनामध्ये आग लागल्यानंतर ती विझवण्यासाठी, अपघात किंवा मोठी दुर्घटना झाल्यानंतर त्यामध्ये बचाव कार्य करण्यासाठी, इमारतीखाली अडकलेल्या - इमारतीच्या लिफ्टमध्ये कोणी अडकल्यानंतर संबंधित व्यक्तीला बाहेर काढण्यासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रणा आणि साधन सामुग्री ठेवण्यात आली आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी अनेक नागरिक तसेच परिसरातील नामांकित शाळांचे विद्यार्थी येत असून उपस्थित अग्निशमन कर्मचाऱ्यांकडून त्यांना त्याबाबत माहितीही दिली जात आहे. दरम्यान या अग्निशमन सप्ताहाचा एक भाग म्हणून येत्या रविवारी 6 एप्रिल रोजी सकाळी 7 वाजता अग्निशमन सुरक्षा सायकल रॅलीचेही आयोजन करण्यात आले आहे. आधारवाडी येथील मुख्य अग्निशमन केंद्रापासून ही सायकल रॅली निघणार असून दुर्गाडी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मोहम्मद अली रोड, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानमार्गे मुरबाड रोड, प्रेम ऑटो, बिर्ला कॉलेज, खडकपाडा, आधारवाडी चौक मार्गे पुन्हा मुख्य अग्निशमन केंद्रात त्याचा समारोप होणार असल्याचेही नामदेव चौधरी यांनी सांगितले. या सायकल रॅलीमध्ये नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन अग्निशमन दलातर्फे करण्यात आले आहे.

# केंद्र सरकारने रोजगार हमी योजनेचा निधी राज्य सरकारला तत्काळ मंजूर करावा

## - रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाचा प्रलंबित निधी राज्याला लवकरात लवकर मिळावा, अशी मागणी आज राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे केली.

कृषी भवन येथे श्री गोगावले यांनी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री श्री चौहान यांची आज भेट घेतली. याभेटी दरम्यान त्यांनी राज्यात रोजगार हमी योजनेतंर्गत सुरू असलेल्या कामांची माहिती दिली तसेच प्रलंबित निधी मिळावा, अशी मागणी केली. या भेटीमध्ये सर्वश्री खासदार श्रीरंग बारणे, डॉ. श्रीकांत शिंदे आणि संदिपान भुमरे हे उपस्थित होते.



भेटीनंतर बोलताना श्री गोगावले यांनी सांगितले, ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी आणि 'विकसित भारत' संकल्पनेला गती देण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रलंबित असलेला निधी त्वरित मिळणे आवश्यक आहे.

मागणीला केंद्र शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री श्री चौहान यांनी आश्वासत केले, केंद्राकडे प्रलंबित असलेला कुशल घटकांसाठीचा 2 हजार 600 कोटी रुपयांचा निधी आणि अकुशल घटकांसाठी (मजूरी ) 1 हजार 200 कोटी रुपयांचा निधी या महिण्याच्या 10 ते 12 एप्रिलपर्यंत राज्याला उपलब्ध करून दिले जाईल. यासोबतच, राज्याला आवश्यक ती सर्व मदत आणि सहकार्य करण्याचे आश्वासनही श्री चौहान यांनी भेटी दरम्यान दिले असल्याचे श्री गोगावले यांनी सांगितले. या निधीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास श्री. गोगावले यांनी यावेळी व्यक्त केला. महाराष्ट्राला सुमारे 10 कोटी मनुष्यदिवसांचे निधी सहाय्य मिळत असून यावर्षी राज्याला रोजगार हमी अंतर्गत 13.50 कोटी मनुष्यदिवसांचे अर्थसहाय्य मिळालेले आहे. यासाठी आभार व्यक्त करून पुढील वर्षी अधिकच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करावी, अशी विनंती अशी श्री गोगावले यांनी यावेळी केली. तसेच, रोजगार हमी योजनेतील व्यक्तिगत लाभांची मर्यादा 5 लाख रूपयांहून 10 लाख रुपयांपर्यंत करण्याची मागणीही रोजगार हमी मंत्री श्री गोगावले यांनी योवळी केली, या मागणीचा विचार सकारात्मक केला जाईल असे आश्वासन केंद्रीय मंत्री श्री चौहान यांनी दिले असल्याचे श्री गोगावले यांनी सांगितले.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते

# राज्यातील ३० भूप्रमान केंद्रांचे उद्घाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : तहसिल कार्यालयामध्ये सुरू असलेल्या सेतु सेवा कार्यालयाच्या धर्तीवर भूमी अभिलेख विभागातील उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे आणि उप अधीक्षक भूमी अभिलेख, शहापूर या कार्यालयातील भुप्रमाण केंद्राचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते दि.04 एप्रिल 2025 रोजी सकाळी 9 वाजता दुरदृश्यप्रणालीद्वारे संपन्न होणार आहे.



या केंद्रामध्ये संगणकीकृत मिळकत पत्रिकेवरील फेरफार सर्व प्रकारचे ऑनलाईन फेरफार अर्ज, ई मोजणी व्हर्जन 2.0 मधील सर्व प्रकारचे मोजणी नकाशे, मिळकतीच्या डिजिटल सही केलेले फेरफार, नोंदवही उतारे आणि ऑनलाईन अर्ज करायची सुविधा, तसेच नकाशे व स्कॅन अभिलेख याच्या डिजिटल सही केलेल्या नकला, जनतेला वाजवी दरामध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यापूर्वी भूमी अभिलेख विभागातील विविध प्रकारचे नकला मिळविण्यासाठी नक्कल अर्ज करण्यासाठी जनतेला कार्यालयात छापील अर्ज करून हेलपाटे घालावे लागत होते. तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी नागरिकांची खाजगी संस्थेकडून आर्थिक पिळवणूक होत होती आणि सुविधा वेळेत मिळत नव्हत्या. परंतू आता भूप्रमाण केंद्राच्या माध्यामातून जनतेला सर्व सुविधा वेळेत आणि वाजवी दरात मिळाल्यामुळे प्रशासनातील विलंब कमी होऊन लोकाभिमुख प्रशासनाला हातभार लागणार आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये एकुण 30 भूप्रमाण केंद्राचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होत असून यामुळे भूमी अभिलेख खाते लोकाभिमुख होणार आहे.




# सम्राट अशोकांच्या जयंतीनिमित्त कोकणस्तरीय जाहीर सभा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारतीय राजमुद्रेचे प्रणेते तसेच राष्ट्रध्वजावर अंकित धम्मचक्रकारक सम्राट प्रियदर्शी अशोक राजा यांच्या २३२९ जयंतीनिमित्त पूर्वेतील अशोकनगर येथील बुद्धभूमी फाउंडेशन येथे शनिवार, ५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता कोकणस्तरीय जाहीर सभेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष भन्ते गौतमरत्न महाथेरो यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी, प्राध्यापक डॉ. महेंद्र दहिवले, नवीन गायकवाड, अर्जुन साळवे उपस्थित होते. या जाहीर सभेसाठी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समिती, बुद्धगयाचे मुख्य संयोजक क्रांतिकारी भंते विनयाचार्य प्रमुख मार्गदर्शक म्हणून संबोधन करणार आहेत. त्याचबरोबर जैन धर्मगुरु, मुस्लिम धर्मगुरु, इसाई धर्मगुरु महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या लढ्याला समर्थन आणि बळकटीसाठी बुध्दभुमी फाउंडेशन येथे येणार आहेत. तरी सर्व बहुजन बांधवांनी मोठ्या संख्येने बुद्धभूमी फाउंडेशन येथे यावे असे जाहीर आवाहनही महाथेरो यांनी यावेळी केले. महाबोधी महाविहार हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून बौद्ध समाजाच्या विश्वासाचे, अस्मितेचे आणि अधिकाराचे प्रतीक आहे. भगवान बुद्धांच्या ज्ञानाचे स्थान केंद्र सरकार आणि बिहार सरकारच्या बौद्धांवर अन्यायकारक धोरणामुळे आजही बौद्धेतरांच्या हस्तक्षेपात अडकले आहे, हा अन्याय असल्याचे मत प्रा. दहिवले यांनी यावेळी व्यक्त केले.१२ फेब्रुवारीपासून बोधगया महाविहार पूर्णपणे बौद्धांच्या हाती येण्यासाठी देशभरातील विविध बौद्ध संघटना बुद्धगया महाबोधी महाविहारा समोर आंदोलन करत आहेत. बोधगया टेम्पल ऍक्ट १९४९ मध्ये बौद्धेतर असलेले ५ सदस्य असणे हा बौद्ध धर्माचा उघड अपमान आहे. आणि विशेषतः शैव महंत ब्राम्हण यांना समितीवर ठेवणे हा बौद्ध धर्माचा अपमान आहे.

महंतांच्या वाड्यात तथागत बुद्धांच्या शेकडो मूर्ती, शिलालेख आणि स्तूप आहेत. सातव्या शतकात आलेल्या हॅन्सन सँगने महाबोधी महाविहारात एक प्रचंड मूर्ती पाहिली तेव्हा ती महंतांच्या खोलीच्या भिंतीत लपवून ठेवली होती. याचे सर्व पुरातत्व पुरावे आपल्याकडे उपलब्ध आहेत. हे केवळ आंदोलन नाही तर हजारो वर्षापासून चालत आलेल्या अन्यायाविरुद्ध बौद्ध समाजाचा क्रांतिकारी प्रतिकार आहे. हा लढा केवळ महाबोधी महाविहार मुक्तीसाठी नाही, तर बहुजन समाजाच्या स्वाभिमान आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचाही असल्याचे भन्ते गौतमरत्न महाथेरो यावेळी म्हणाले.

# वनमंत्री गणेश नाईकांच्या अध्यक्षतेखाली वाशी येथे जनता दरबाराचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली उद्या शुक्रवार, दि.०४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने लेखी स्वरूपात तीन प्रतीत सादर करायची आहेत. नागरिक आपले नाव नोंदणी करून आपल्या समस्या किंवा अडचणीचा निपटारा करू शकणार आहेत.

यापूर्वी झालेल्या जनता दरबारामध्ये नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला होता. दि.०४ एप्रिल रोजी होणाऱ्या जनता दरबारामध्ये नागरिकांनी आपल्या समस्या मांडून त्यांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# गांवाच्या विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा संवादसेतू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : राज्य शासनामार्फत ग्रामपातळीवर विविध योजना, उपक्रम राबविण्यात येतात. जिल्ह्याच्या विकासामध्ये ग्रामविकास आणि लोकसहभाग खुप महत्वाचा असतो. या विकासाबाबत गावकऱ्यांचे अभिप्राय, अपेक्षा, समस्या आणि जिल्हा प्रशासन यांच्यामध्ये जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज संवाद सेतू बांधला. निमित्त होते संवाद सेतू उपक्रमाचे.जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून होत असलेला विकास आणि गावकरी यांच्याशी हितगुज करण्यासाठी संवाद सेतू हा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमंतर्गत आपटा आणि कर्नाळा ग्रामपंचायत मधील ग्रामस्थ, शेतकरी, शिक्षक, आरोग्य सेविक, अंगणवाडी सेविका यांच्याशी संवाद साधला.

या उपक्रमाच्या माध्यमातून गाव सक्षम करण्यावर आणि ग्राम विकासात लोकसहभाग वाढविणे तसेच समस्या तात्काळ सोडविण्यास प्राधान्य देणे हा मानस असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी नमूद केले. प्रत्येक आठवड्याला मंगळवार किंवा गुरुवार रोजी स. 10 वा हा संवाद सेतू कार्यक्रम होणार असल्याचे सांगितले.आपटा ग्रामपंचायत उपसरपंच चव्हाण यांनी गावातील गटारी आणि पाणी पुरवठा समस्या सांगितली. याबाबत जिल्हाधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना तात्काळ गटारी स्वच्छ करण्याचे तसेच त्याचे बांधकाम करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नरेगा मधून शोषखड्डे घेण्याबाबत निर्देश दिले. गावातील स्वछता गृह, पाणी पुरवठा, रस्ते, वीज याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणाना दिले. आरोग्य सेवक, शिक्षक पदे रिक्त आहेत. ही सर्व रिक्त पदे लवकरच भरण्यात येईल असेही श्री जावळे आश्वस्त केले.

# छत्रपती शिवाजी महाराजांना विधान भवनात आदरांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनातील त्यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्यास महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य संजय खोडके यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) जितेंद्र भोळे, सह सचिव नागनाथ थिटे, उप सचिव विजय कोमटवार, मोहन काकड, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र संचालक निलेश मदाने, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती यांचे विशेष कार्य अधिकारी राजेंद्र घाडगे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळयास पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# साप्ताहिक कल्याण प्रजाराजचा ३० वा वर्धापन दिन संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कथाकार, पत्रकार आणि कलाकार हे आपल्या समाजाचे तीन विभिन्न अंग आहे हे तिन्ही अंग आपली जबाबदारी,भूमिका, सात्विक, आणि पुरुषार्थ करून बजावतील तर आपला समाज तंदुरस्त व समुद्ध होऊन समाजाचा विकास होईल असे मत भागवताचार्य पू. भूपेंद्रभाई पंड्या यांनी कल्याण येथे व्यक्त केले. के.सी. गांधी स्कूल ओडीटोरीयम येथे आयोजित साप्ताहिक कल्याण प्रजाराजच्या ३०वा वर्धापनदिन सोहळयात अध्यक्ष स्थानी ते बोलत होते.

या कार्यक्रमात आमदार विश्वनाथ भोईर, आमदार सुलभा गायकवाड, सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, कल्याण प्रजाराजचे संपादक रवि चौधरी, व्यापारी अग्रणी प्रेमजी गाला, दिपक पोपट, भूषण कारीया, केतन पटेल, व रमेश पटेल सहीत मोठी संख्येने व्यापारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. ह्या प्रसंगी संपादक रवि चौधरी यांनी ३० वर्षाची कल्याण प्रजाराजच्या वाढचाल संबंधित माहिती दिली.

पू. भूपेंद्रभाई पंड्या यांच्या हस्ते कल्याण प्रजाराजच्या ३०वा वर्धापन अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

या समारंभात आमदार विश्वनाथ भोईर व सुलभा गायकवाड यांनी आपले विचार व्यक्त केले व कल्याण प्रजाराजला शुभेच्छा दिल्या. प्रमोद हिंदुराव यांनी सांगितले की ३० वर्ष वृत्तसेवा नियमितपणे चालवून एक प्रकारे समाजाची ३ दशक सेवा केली आहे. भूपेंद्रभाई हे पुढे म्हणाले की सातत्य, सात्विकता, सहरुदयता आणि समर्पित भावनेने कल्याण प्रजाराजनी ३० वर्षाची अविरत यात्रा पूर्ण होऊन ३१ वा वर्षात पदार्पण केले आहे हे गौरव करण्या सारखे आहे. या कामी चौधरी परीवाराच्या तिन पिंढ्यांनी मेहेनत घेतली आहे. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रो. भरत लिबड यांनी केले व आभार प्रदर्शन विष्णूकुमार चौधरी यांनी केले. या प्रसंगी प्रतिष्ठित व्यापारी व लेखक, पत्रकार यांचा सत्कार करण्यात आला.

# जाखड यांची बदली राज्य सरकारची निष्क्रियता दर्शवते

## - नोवेल साळवे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या अचानक बदलीच्या निर्णयामुळे नागरिक चिंतेत पडले आहेत. प्रशासनाच्या फिसकटलेल्या यंत्रणांवर अंकुश आणायचे प्रयत्न करत असताना जाखड यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच त्यांची बदली होणे राज्य सरकारची निष्क्रियता दर्शवित असल्याचे मत शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



एवढ्या वर्षात प्रथमच केडीएमसीला उत्तम काम करणारी आयएएस महिला आयुक्त लाभली होती. परंतु, महापालिकेला भ्रष्टाचाराचे कीड लागल्याच्या कारणाने आणि प्रत्येक गोष्टीत मोठ्या राजकारणी लोकांच्या हस्तक्षेपामुळे चांगले आयुक्त येथे टिकणे कठीण झाल्याची सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे.

जाखड यांच्यासारखा कर्तव्यदक्ष नवीन आयुक्त महानगरपालिकेत आल्यावर त्यांना त्यांची कामगिरी दाखवण्याची व जनतेची सेवा करण्याची संपूर्ण संधी राज्य सरकारने दिले पाहिजे. याप्रकारे जर मध्येच कुठल्याही आयुक्तांची बदली करण्यात आली तर ते शहराचे विकास आणि नागरिकांची हिताचे काम करू शकत नसल्याचे साळवे म्हणाले.

# 'वांद्रे स्मार्ट सिटी प्रोजेक्ट' अंतर्गत घरांचे स्वप्न पूर्ण होणार

## - पालकमंत्री ॲड. आशिष शेलार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : विकासकामे करताना मानवी चेहरा जपणे गरजेचे असते. त्यामुळे वांद्रे पूर्व येथे 'वांद्रे स्मार्ट सिटी प्रोजेक्ट' अंतर्गत गौतम नगर येथील अनेक कुटुंबांचे घरांचे स्वप्न पूर्ण होत आहे, असे प्रतिपादन मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले.

वांद्रे पूर्व येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत पुनर्वसित होत असलेल्या रहिवाशांना त्यांच्या नवीन घरांचे करारपत्रे वितरणाचा कार्यक्रम मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. पालकमंत्री ॲड.शेलार यांच्या हस्ते १० लाभार्थ्यांना घरांचे करारपत्रे यावेळी वितरित करण्यात आली. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड.शेलार म्हणाले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री व संबंधित अधिकाऱ्यांच्या सहकार्याने हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण होत आहे. गणपती उत्सवाच्या आधीच रहिवाशांनी त्यांच्या नव्या घरात प्रवेश करावा, यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

वांद्रे पूर्व येथील ३०.१६ एकर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची जमीन उच्च न्यायालयाच्या ताब्यात देण्याचा निर्णय घेण्यात आला, असे सांगून पालकमंत्री ॲड.शेलार म्हणाले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वांद्रे पूर्व येथील ओमसाई सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या ७७ सदनिका व बालाजी शॉप किपर्स येथील ६७ सदनिका अशा एकूण १४४ सदनिका शासनाकडे पाठपुरावा करुन उपलब्ध करुन घेतल्या आहेत. या सदनिका तयार होण्यास सहा ते नऊ महिन्याचा अवधी लागणार असल्याने १०० पात्र झोपडीधारकांने स्वखर्चाने पर्यायी राहण्याची व्यवस्था करण्याची अट नमूद करुन पात्र झोपडीधारकांशी करारनामे करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# इनरव्हील क्लबमध्ये 'वाडीची जत्रा'



## मस्ती मनोरंजन जादू स्पर्धांची रेलचेल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : शहरातील नागरिक तसेच त्यांच्या मुलांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने इनरव्हील क्लबच्या पुढाकाराने आयोजित 'वाडीची जत्रे'मध्ये उपस्थितांनी मनमुराद आनंद घेतला .

इनर व्हील क्लब ऑफ अंबरनाथतर्फे शनिवारी वाडीची जत्रा २०२५ उपक्रम सामुदायिक भावनेने आयोजित करण्यात आला होता. अध्यक्ष रेवती वारीयर यांच्या नेतृत्वाखाली, क्लबच्या सदस्यांनी अंबरनाथपूर्वेकडील कातकरी वाडी, ठाकूर पाडा, जावसई येथील मुलांनी अविस्मरणीय अनुभव अनुभवला. यामध्ये चित्रकला स्पर्धा, झुम्बा सत्र , जादूचे कार्यक्रम ,विदुषक, शुभंकर, जम्पोलाइन, आनंदोत्सव शिवाय बक्षिसे आणि लकी ड्रॉमध्ये प्रत्येकाचे मन हरपून गेले होते.

प्रकल्प अध्यक्ष सोनी बड्डुगु आणि प्रकल्प समन्वयक डिंपल शाह यांच्या मार्गदर्शनाखाली २०० हून अधिक जण सहभागी झाले होते.

क्लब सदस्यांनी उदारतेने विविध रोमांचक स्टॉल्सचे प्रायोजकत्व केले, ज्यामध्ये जोडीला क्लब सदस्यांनी साकारलेल्या चविष्ठ अल्पोपहाराच्या स्टॉलवरील स्वादिष्ट भोजन , नाश्ता, ज्यूस आणि पेये यामुळे मुलांच्या आनंदाला उधाण आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन अध्यक्ष रेवती वारीयर आणि पदाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले, हास्य, उत्साह आणि सामुदायिक भावनेने भारलेल्या संध्याकाळची सुरुवात झाली. वाडीतील लहान मुलांना आणि रहिवाशांना विविध प्रकारच्या रोमांचक उपक्रमांचा आनंद देण्यात आला .

अखंड आनंद, समाधान आणि सामुदायिकतेची आठवणी मागे सोडून सायंकाळी वाडीची जत्रा संपली

# मुरबाड आगरात राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून महिलांचा 'महिला सन्मान' योजनेअंतर्गत प्रवास

## आगाराला ११ कोटी ५९लाख रुपयाचे मिळाले उत्पन्न !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : राज्य सरकारच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात एसटी बसेस ला पन्नास टक्के महिलांसाठी सवलत प्रवास सुरू केल्याने ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात मुरबाड बस मधून सन २०२३ते सन २०२५, एप्रिल २०२५ पर्यंतच्या कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात ६२लाख ७७हजार ४१५ महिलांनी महिला सन्मान योजना अंतर्गत प्रवास केला आहे. त्यामुळे मुरबाड आगाराला मिळाले ११ कोटी ०५९ लाख ३९७१ रुपयाचे उत्पन्न प्राप्त झाल्याची माहिती मुरबाड आगार प्रमुख योगेश मुसळे यांनी दिली आहे. तसेत मुरबाड ग्रामीण भागातील तसेच आदिवासी पट्टयात व मुरबाड शहर परिसरात महिला सन्मान योजनेला





चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच मुरबाड ग्रामीण भाग तसेच मुरबाड- बदलापूर , तसेच मुरबाड- कल्याण यांच्यासह जवळपास मुरबाड बसेसचे ५४ रूट आहेत त्या रुटवर सध्या मुरबाड ग्रामीण भागातून बस धावत आहे त्यामुळे जास्तीत जास्त महिलांनी राज्य सरकारने सन्मान योजना ५० टक्के सन्मान योजना लागू केली आहे त्याचा महिलां प्रवास करून लाभ घेत आहेत त्याचबरोबर अमृत योजना अंतर्गत ७५ वर्षांवरील जेष्ठ नागरिक आता पर्यंत २८८९१६ जेष्ठ नागरिकांनी मोफत प्रवास केला आहे त्यामुळे मुरबाड आगाराला ४ कोटी १२लाख ८५ हजार ३७४ रुपयाचे उत्पन्न मुरबाड आगाराला प्राप्त झाले आहे.

त्यामुळे संपूर्ण ठाणे जिल्ह्यात मुरबाड आगाराचे उत्पन्नाच्या बाबतीत नंबर वन वरच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# मुरबाड अष्टविनायक ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था चेअरमन पदी सुभाष पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड अष्टविनायक ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची नवनिर्वाचित संचालक मंडळाची प्राथमिक सभा बुधवारी संपन्न झाली.

या सभेत बिनविरोध चेअरमन म्हणून सुभाष पवार यांची निवड तर व्हाईस चेअरमन पदी अशोक पटोले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

ही सभा निवडणूक निर्णय अधिकारी सुजय पोटे सहायक निबंधक मुरबाड यांच्या अध्यक्षते खाली पार पडली. नवनिर्वाचित संचालक म्हणून खंडू मोरे ,सुनील रोडगे., दिलीप गायकवाड, संदीप बाहाडकर, दिनकर बांगर, श्रीकांत कोर, मनोज डूनकवाल, केतना ठाकरे, डोंगरे सरिता यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे नवनिर्वाचित चेअरमन , व्हाईस चेअरमन, सर्व संचालक यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नवी मुंबईत पाणी देयकही ऑनलाईन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबईत यंदाच्या वर्षापासून नागरिकांना पाणी देयक ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून सर्व पेंमेंट सुविधेव्दारे ती भरणा करता येणार असल्याची माहिती नवी मुंबई महापालिकेने दिली. त्यासोबतच मालमत्ताकराचे वर्षभराचे एक देयक अदा केले जाणार असून नागरिक वर्षभरात टप्प्याटप्प्याने देयक रक्कम भरू शकतात असे महापालिकेने स्पष्ट केले.

# वागळे इस्टेट परिसरात कचऱ्याचे ढिग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : स्वच्छ ठाणे सुंदर ठाणे हे ब्रीद वाक्य खरे ठरविण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्यावतीने अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. संसर्ग होऊ नये म्हणून सार्वजनिक ठिकाणी असलेले अनेक कचरा डेपो बंद करून स्वच्छतेची काळजी घेतली जात आहे. दंडात्मक कारवाई सुद्धा केली जात आहे. सध्या ठाणे शहर हे कचऱ्याचे शहर अशी ओळख निर्माण होत असताना महिन्यांपासून कचरा डेपोचा विषय चर्चेचा विषय बनला आहे. वेळेवर कचरा न उचलल्यामुळे परिसरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. एवढेच नव्हे तर दुपारी 12.30 ते 2.30 च्या दरम्यान

कचरा घेऊन जाणाऱ्या गाड्या रस्त्यावरती असतात आणि त्याची दुर्गंधी इतक्या प्रमाणात असते की रस्त्यावरून प्रवास करत असताना हातात नाक धरून प्रवास करावा लागतो.

ठाण्यातील कोरस रोड, वर्तकनगर परिसरात ठिकठिकाणी कचरा टाकण्याचे प्रमाण वाढत असल्याने कचऱ्याचे साम्राज्य वाढले आहे. कोरसरोड, वर्तकनगर परिसरात ठाणे महानगरपालिकेने ठाणे शहरातील प्रकल्प, धोकादायक इमारत, रस्ता रुंदीकरण यामध्ये बाधित झालेल्या बाधितांना तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर रेंटल हाऊसिंग इमारतीमध्ये सदनिका देण्यात आलेले आहेत. अशा चार इमारतीच्या बाजुला आणि कोरस रोड रस्त्यावर परिसरातील नागरिकांडून कचरा टाकला जात आहे. वेगवेगळ्या प्रकारे टाकलेला हा कचरा इतरत्र उडत आहे. येथेच बस थांबा आहे. या ठिकाणी सकाळच्या वेळे

वेळेत शाळेत जाणारे विद्यार्थी, पालक, कामानिमित्त घरातून बाहेर निघणारे नागरिक यांना सकाळी या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. या सदनिकातील नागरिकांची सकाळ कचऱ्याच्या दुर्गंधीने होत आहे. या कचऱ्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरत आहे. त्याकडे ठामपा अधिकारी यांचे दुर्लक्ष होत आहे. येथील कचऱ्याच्या दुर्गंधीचा परिसरातील नागरिकांना त्रास होत असून त्यांचे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. येथे कायम कचरा टाकला जातो.



येथे कसल्याही प्रकारची कचराकुंडी नाही. तसेच या कचऱ्याच्या बाजूला परिसरात सुरू असलेल्या इमारतीचे रॅबिट व घरातील इतर कचरा अनेक दिवसांपासून धूळखात पडलेला आहे. याकडे सुद्धा कुणाचं लक्ष नाही. ही कचऱ्याची समस्या सुटण्यासाठी ठाणे महानगरपालिका घनकचरा विभागाचे अधिकारी, विभागाचे लोकप्रतिनिधी यांनी एकत्र येवून या प्रश्नावर चर्चा करून कायम स्वरूपाचा मार्ग काढणे गरजेचे आहे.

परिसरातील रहिवाशांकडून प्लास्टिकच्या पिशव्या, भाजी-पाला पोत्यांमध्ये बांधून येथे कचरा टाकला जात आहे. त्यामुळे तो त्यातच कुजतो, सडतो आणि तेथेच साचून राहतो. त्याचे प्रमाण इतके जास्त आहे की, दिवसभरातच येथे कचऱ्याचे ढिग साचतात. हा कचरा रोज उचलला जात असला तरी या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. अतिशय कुबट, सडलेल्या पदार्थाचा वास या परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना त्रासदायक ठरतो. येथील रहीवाशांना तर तो कायमचा मनस्ताप ठरत आहे. येथून वावरताना नाकावर हात ठेऊनच चालावे लागते. या कचऱ्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या कचऱ्यावर वावरणारी भटकी कुत्री, जनावरे, वेगवेगळे पक्षी यांच्यामुळे परिसरात घाण आणि संसर्ग पसरत आहे. ठाणे महानगरपालिका घनकचरा विभागाचे अधिकारी यांचे कडून या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जात आहे. तरी संबंधीत प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता याची गांभिर्याने दखल घ्यावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

तसेच वागळे इस्टेट परिसरातील इंदिरा नगर, रोड नंबर 33 व आंबेवाडी येथे वर्षानुवर्षाचा रस्त्याच्या कडेला आणि रस्त्यावरती उघड्यावर कचरा डेपो आहे. या ठिकाणी भाजी व मच्छी मार्केट मधील ओला सुखा कचरा व मार्केट मधील भाज्या टाकल्या जातात आणि हा कचरा ओला असल्यामुळे यामधून फार दुर्गंधी येते. या रस्त्यावरून जात असताना येथील प्रवाशांना वाहनचालकांना नाक हातामध्ये धरून प्रवास करावा लागत आहे. या कचराऱ्यामुळे परिसरात डेंगू, मलेरिया सारखे आजार पसरण्याची शक्यता आहे. तसेच या कचऱ्यामध्ये पक्षी, गाय, डुक्कर अशा जनावारांचा वावर वाढला आहे. या घाणीचे साम्राज्यामुळे परिसरातील रहीवाशी आपला जीव मुठीत धरुन जीवन जगत आहेत. नागरिकांच्या आरोग्यासाठी आरोग्य विभागाने याकडे दुर्लक्ष न करता येथील कचरा वेळेवर उचलावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024